# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 18/03/2021 (गुरूवार)
(दुपार)

---

### विनयभंग

1) पो.स्टे. भिवापुर :– दिनांक 17/03/2021 चे 20.00 वा. दरम्यान आरोपी नामे क्र. 1) शंकर गोपाळ हिवसे, वय 55 वर्ष, 2) वैभव शंकर हिवसे, वय 22 वर्ष, दोन्ही रा मांडवा (सरांडी) पो.स्टे भिवापूर यांचा फिर्यादी वय 38 वर्ष हिच्या पतीसोबत जुना वाद असल्याने आरोपीतांनी फिर्यादीसोबत भांडण करून म्हटले की, ''तुझ्या नवऱ्याने माझ्या विरूद्ध पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली'' या कारणावरून भांडण करून आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. फिर्यादीची सासु हि भांडण सोडविण्याकरीता मध्यस्ती करण्यास आली असता तिला सुद्धा आरोपीने मारझोड करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ), 326, 504, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि शरद भस्मे पो.स्टे भिवापूर मो.नं 9764946808 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– दि. 17/03/2021 चे 13:30 वा. ते 14:00 वा. चे सुमारास फिर्यादी यांची पत्नी वय 32 वर्ष ही एकटीच घरी हजर असतांना आरोपी नामे– परदेशी लालचंद नागपूरे, रा. कूसूंबी ता. सावनेर याने पीडितेच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि रासकर या करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 5 कि.मी. अंतरावरील मारोडी ते मौदा येथे दिनांक 07/03/2021 चे 14:00 वा. ते 14.30 वा. दरम्यान आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील एमपी–50/डीए–0907 क्रमांकाची ॲम्बुलन्स हि भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने ॲम्बुलन्सचा संतुलन बिघडला. त्यामुळे ॲम्बुलन्स रोडच्या बाजुला उलटल्याने ॲम्बुलन्स मधील ड्रायवर शकील सिददकी, व कंडक्टर तारूपेंटर शंकरलाल सिदे, वय 40 वर्ष, रा. गुडी त. जि बालाघाट हे दोघेही जख्मी झाले. त्यांना उपचाराकरीता नागपुर मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता उपचार दरम्यान कंडक्टर तारूपेंटर शंकरलाल सिदे हे उपचार दरम्यान दि 17/03/2021 रोजी सकाळी 20.30 वा. मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आकाश राजेश जैन, वय 28 वर्ष, रा. पाराशिवनी जि बालाघाट (एमपी) यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा कुथे मो.नं. 9764007720 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर